कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्था संचलित,

# के. के. वाघ तंत्रनिकेतन, नाशिक

हिराबाई हरिदास विद्या नगरी, अमृतधाम पंचवटी, नाशिक

## के के वाघ तंत्रनिकेतनमध्ये 'वाचन प्रेरणा दिन' साजरा ....

के. के. वाघ तंत्रनिकेतन, नाशिक येथे माजी राष्ट्रपती श्री. ए. पी. जे. अब्दूल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या अनुषंगाने दि. १५ ऑक्टोबर २०२२ रोजी "वाचन प्रेरणा दिवस" म्हणून साजरा करण्यात आला.

के. के. वाघ तंत्रनिकेतन, नाशिकमध्ये माजी राष्ट्रपती श्री. ए. पी. जे. अब्दूल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त मा. प्राचार्य पी. टी. कडवे यांच्या हस्ते श्री. ए. पी. जे. अब्दूल कलाम प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. सदर कार्यक्रमास प्रा. ए. डी. वाटपाडे, प्रा. एस. बी. पवार, श्री. आर. व्ही गायकवाड, सौ. एस. आर. जाधव, सौ. के. ए. मत्सागर, प्रा. कविता आहिरे तसेच इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व तंत्रनिकेतनचे विदयार्थी उपस्थित होते.

विदयार्थ्यांमध्ये व समाजाच्या इतर घटकांना वाचनाची आवड व प्रेरणा निर्माण वाचनाचे महत्व पटवून देण्याच्या उददेशाने के. के. वाघ तंत्रनिकेतनमधील मध्यवर्ती ग्रंथालयामध्ये ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनादवारे विदयार्थ्यांना विविध प्रकारच्या साहित्याची ओळख ग्रंथ प्रदर्शनाच्या माध्यमातून करून देण्यात आली.

वाचनाची रूची निर्माण होण्यासाठी आपल्या आवडीची पुस्तके वाचण्याची सवय व्हावी, कारण वाचनाने ज्ञान वृध्दिंगत होवून आपल्या विचारांमध्ये प्रगल्भता येते आणि यातून वाचनाची आवड निर्माण होते. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेट, मोबाईल, लॅपटॉप, ब्लूटूथ इ. साधने उपलब्ध असून देखील मात्र त्याचा समाधानकारक वापर होतांना दिसून येत नाही. यासाठी सदर ग्रंथ प्रदर्शनात विविध विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले.

सदर ग्रंथ प्रदर्शनास तंत्रनिकेतनमधील विदयार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. तसेच तंत्रनिकेतनमधील सर्व विभागांतील विदयार्थ्यांना विभागप्रमुख व शिक्षकांनी वाचन प्रेरणा दिवस याबददल माहिती दिली व विदयार्थ्यांना वाचनाचे महत्व पटवून देण्यात आले. तसेच विदयार्थ्यांना व्हॉटसअप, फेसबूक, इंस्टाग्राम यांसारख्या सोशल मिडीयादवारे उपलब्ध असलेल्या वाचन साहित्याचा जास्तीत जास्त वापर करून वाचन संस्कृती जतन करण्यासाठी आवाहन केले.




के. के. वाघ तंत्रनिकेतन, नाशिक येथे माजी राष्ट्रपती श्री. ए. पी. जे. अब्दूल कलाम यांच्या जयंतीस साजरी करतांना तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विदयार्थी.





वाचन प्रेरणा दिवसानिमित्त के. के. वाघ तंत्रनिकेतन, मध्यवर्ती ग्रंथालय येथे आयोजित ग्रंथ प्रदर्शनात उपस्थित विदयार्थी.